महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – ४४० ०२२
दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U85300PN2019NPL187405 ई-मेल: fellowshipmahajyoti@gmail.com

जावक क्र. महाज्योती/नागपूर/व्या.वै.प्र./२०२२/४७१ दि.२९.०७.२०२२

# परिपत्रक

**विषय : व्यावसायिक वैमानिक प्रशिक्षणासाठी तात्पुरती (Provisional) निवड झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणेबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर मार्फत व्यावसायिक वैमानिक प्रशिक्षणासाठी अर्ज मागविण्यात आलेले होते, त्यानुसार पात्र उमेदवारांची दि.१२.०७.२०२२ रोजी छाननी परीक्षा घेण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने दि.२७.०७.२०२२ रोजी नोंदणी क्रमांकानुसार (As per Registration Number) व गुणांकनानुसार (As per Merit List) निकाल प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. जाहिरातीत आरक्षण वर्गवारी पुढीलप्रमाणे प्रसिद्ध करण्यात आलेली होती.

| अ क्र | सामाजिक प्रवर्ग | एकूण आरक्षण टक्केवारी | एकूण आरक्षित जागा | ग्रामीण क्षेत्रासाठी आरक्षित जागा | शहरी क्षेत्रासाठी आरक्षित जागा |
|---|---|---|---|---|---|
| १ | इतर मागास वर्ग | ५९% | १२ | ६ | ६ |
| २ | भटक्या जाती व विमुक्त जमाती | ३५% | ७ | ४ | ३ |
| ३ | विशेष मागास प्रवर्ग | ६% | १ | १ | |
| | एकूण जागा | १००% | २० | ------- | ------- |

छाननी परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांकनाच्या आधारे व नमूद आरक्षण वर्गवारी विचारात घेऊन २० उमेदवारांची तात्पुरती (Provisional) निवड यादी सोबत जाहीर करण्यात येत आहे.

तात्पुरती (Provisional) निवड झालेल्या उमेदवारांनी DGCA Approved Medical Practitoner यांचेकडून Class II Medical Certificate प्राप्त करून सादर करणे आवश्यक राहील. तसेच तात्पुरती (Provisional) निवड झालेल्या उमेदवारांचे चारित्र्याची तपासणी पोलीस विभागामार्फत करण्यात येईल आणि ती प्राप्त झाल्यानंतरच त्यांच्या प्रशिक्षणाची निवड कायम होईल. तात्पुरती (Provisional) निवड झालेल्या उमेदवारांना कार्यालयाकडून पुढील प्रक्रिया स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल. तात्पुरती (Provisional) निवड झालेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांची कागदपत्रांची तपासणी समाधानकारक होईल त्यांचीच निवड ही अंतिम करण्यात येईल.

ज्या तात्पुरती (Provisional) निवड झालेले उमेदवारांचे वैद्यकीय प्रमाणपत्र व चारित्र्य तपासणी अहवाल समाधान कारक राहणार नाही, तसेच विहित मुदतीत सादर करू शकणार नाहीत त्यांची निवड रद्द करून अश्या उमेदवारांच्या जागेवर गुणांकन व सामाजिक प्रवर्ग आरक्षणानुसार पुढील उमेदवारांना संधी प्रदान करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

स्वा/-
व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व
प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर

प्रतिलिपी:

१. मा.विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस्तव सादर.
२. व्यवस्थापकीय संचालक, नागपूर फ्लाईंग क्लब, नागपूर यांना माहिती तथा योग्य कार्यवाहीस्तव.